**प्रेसनोट दिनांक - १३/०७/२०१९**
**डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**पोलीसांच्या सतर्कतेमुळे मोटार सायकल मालकाच्या ताब्यात देण्यात आली.**

---

दिनांक १३/०७/२०१९ रोजी बालगंधर्व बीट मार्शलवर श्री शिंगाडे, पोशि ९९५२ व श्री डामसे पोशि ३९६८ यांना दिवसपाळी ड्युटी अंमलदार असताना बालगंधर्व चौकीचे ड्युटी अंमलदार श्री रायकर पोना २९४५ यांनी बीट मार्शलशी संपर्क करुन छत्रपती लॉज पुलाचीवाडी डेक्कन पुणे येथे संजय जैसवाल यांनी त्यांची हीरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल एमएच-१२, एवाय-१६९६ ही पार्क केलेल्या ठिकाणी मिळत नसल्याचे कळविले. बीट मार्शल यांनी सदर ठिकाणी जाऊन शोध घेतला असता त्यांना छत्रपती लॉज च्या पाठीमागे सदरची गाडी मिळुन आली. बीट मार्शल यांनी संजय जैसवाल यांना बोलावुन घेऊन त्यांची मोटार सायकल बालगंधर्व चौकी येथे आणुन त्यांचे ताब्यात देण्यात आली. संजय जैसवाल यांनी पोलीसांनी मोटार सायकलचा तात्काळ शोध घेऊन परत मिळवुन दिल्याने पोलीसांचे आभार मानले.

